# आयशरची प्रो ६००० सिरीज सुरू

**पणजी, दि. २५ (पत्रक) :**




व्हीई कमर्शिअल व्हेईकल्स लिमिटेड (व्हीईसीव्ही) ने नेक्स्टजनरेशन हेवी ड्युटी ट्रक्सच्या आयशर प्रो ६००० सिरीजची पश्चिम भारतात सुरुवात झाली असून आता ही सिरीज उपलब्ध असल्याचे मुंबईतील एका कार्यक्रमात घोषित केले. आयशर प्रो ६०३१, आयशर प्रो ६०२५ हॉलेज ट्रक्स आणि आयशर प्रो ६०२५टी टिपर यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानासह डिझाईनमुळे आयशर ब्रँडचा प्रवेश हेवी–ड्युटी कमर्शिअल व्हेईकल बाजारपेठेत दिमाखात झाला. आयशर प्रो ६००० 'दि फ्यूचर ऑफ इंडियन ट्रकिंग'चे प्रतिनिधित्व करत असून व्होल्व्हो ग्रुप आणि आयशर दरम्यानच्या युतीमुळे विकसित तसेच उत्पादित करण्यात आले आहे.

संपूर्ण नवीन आयशर प्रो ६००० सिरीजची सुरुवात करताना व्हीई कमर्शिअल व्हेईकल्स ते विक्री, विपणन आणि विक्रीपश्चात सेवेचे कार्यकारी उपाध्यक्ष ए के बिर्ला म्हणाले, दि आयशर प्रो ६००० सिरीज ही नेक्स्ट जनरेशन हेवी ड्युटी ट्रक्सची रेंज असून विश्वासार्हता, कार्यक्षमता आणि उत्पादकता यावर ती अवलंबून आहे. व्होल्व्हो ग्रुपचे जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान आणि किंमतीबाबतचे कौशल्य व आयशरचे व्यवस्थापन यांनी निर्माण केलेली रेंज ही ग्राहकांच्या नफ्यासंबंधीच्या मागण्या व चालकाच्या परिणामकारकतेबाबतच्या मागण्यांसंबंधी नवीन मापदंड उभारणारी आहे.